# वाशिम यशोगाथा

## ‘प्रधानमंत्री मुद्रा योजना’ अंतर्गत अर्थसहाय्यामुळे व्यवसाय वाढ

नाव : प्रदीप आरु

मोबाईल न. : ९६७३३५५०५५.

गाव : रिठद, ता. रिसोड. जिल्हा वाशिम

व्यवसाय : श्रेया झेरोक्स, स्टेशनरी आणि जनरल स्टोअर्स, वाशिम

मुद्रा योजनेच्या माध्यमातून लाखो तरुण स्वयंरोजगाराकडे वळत आहेत.या योजनेमध्ये कुठल्याही प्रकारचे भांडवल लागत नसल्यामुळे तरुणांना याचा मोठ्या प्रमाणात फायदा होत आहे. त्यामुळे तरुणांनी या योजनेचा लाभ घेऊन रोजगार मिळवण्यापेक्षा रोजगारनिर्मिती करून स्वाभिमानाने जगता यावे याकरिता सुरु करण्यात आलेली मुद्रा योजने मुळे बेरोजगारांचे रोजगारी मिळविण्याचे स्वप्न साकार होताना दिसत आहे. असेच एक छोटे उद्योजक आज मोठ्या उद्योजकतेकडे वाटचाल करतांना दिसत आहेत. प्रदीप आरु रिसोड तालुक्यातील छोट्या रिठद गावातून रोजगार प्राप्ती च्या उद्देशाने वाशिम शहरा मध्ये आपला छोटा व्यवसाय सुरु करतात. कोणत्याही सहकार्याविना सुरु केलेला व्यवसाय वाढीस अनंत अडचणी येत होत्या. परंतु प्रधान मंत्री मुद्रा योजनेची माहिती मिळताच त्यांनी वाशिम येथील बँक ऑफ महाराष्ट्र च्या व्यवस्थापकांची भेट घेतली व त्यांना त्यांच्या व्यवसाय वाढीची संकल्पना स्पष्ट करून दाखविली. व्यवस्थापक साहेबांनी सुद्धा बँकेचे कर्ज देणे आणि उद्योजक घडविणे या उद्देशाची पूर्ती म्हणून प्रदीप यांना तातडीने मुद्रा अंतर्गत ४ लाख रुपयाचे कर्ज मंजूर करून दिले. आज प्रदीप यांच्या श्री झेरोक्स, स्टेशनरी आणि जनरल स्टोअर्स ची एकूण गुंतवणूक 14 लाख रुपये असून मासिक उत्पन्न ७० ते ८० हजार पर्यंत आहे. प्रदीप आज ही बँक व्यवस्थापक आणि मुद्रा योजनेचे आभारी आहेत व नियमित कर्ज परत फेड करत असतात.




